केवळ खाजगी वितरणाकरिता

ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन®

जुलै २०१४ खंड ७ अंक ४



## मणपाक्कम येथील बातम्या

**मे २०१४**

**भंडारा–समाप्तीनंतर:** गुरुदेव खिन्नपणे उद्गारले की आता भंडारा संपन्न झाला असल्यामुळे अभ्यासी आश्रम सोडून जातील व हा परिसर रिकामा होईल. हा भंडारा विशेष असा होता कारण उत्सवाच्या तीनही दिवसांचे सकाळचे सत्संग गुरुदेवांनी स्वत: संचालित केले होते. त्यांची प्रकृती बरी असल्यामुळे जेव्हा शक्य होईल तेव्हा ते कुटिरामध्ये बैठका घेत होते, विचारविनिमय करीत होते. शनिवार, दि. ३ मे रोजी, सकाळी न्याहरीनंतर गुरुदेव बऱ्याच लोकांना भेटले व त्यांनी सिटिंग देण्याची इच्छा व्यक्त केली. कोणाला सिटिंगला बोलवायचे याविषयी ते ठाम होते. बाकीच्या लोकांना बाहेर थांबण्यास सांगून त्यांनी एक प्रदीर्घ सिटिंग दिले. त्यानंतर सकाळचा वेळ त्यांनी आपल्या कार्यालयात अभ्यासींच्या गटाबरोबर संभाषणात व्यतित केला.

**नवीन गोल्फ गाडी :** सुटी करता येणारी, इलेक्ट्रॉनिक संचालित खुर्ची असलेली एक नवीन गोल्फ गाडी गुरुदेवांसाठी आणण्यात आली आहे. आता गुरुदेवांची चाकांची खुर्ची गोल्फ गाडीला जोडता येते, गुरुदेवांसह त्यांच्या खुर्चीला उचलून त्यांना विविध स्थितींमध्ये हलवता येते. गुरुदेवांनी या गोल्फ गाडीतून एक फेरफटका मारला आणि या यंत्ररचनेने ते खूप प्रभावित झाले. यामुळे गोल्फ गाडीत चढणे व उतरणे त्यांना सुकर झाले आहे व आता नियमितपणे फेरफटका मारण्यास ते उत्सुक आहेत.

गुरुदेवांचा नातू भार्गव चेन्नई येथे आल्यामुळे त्यांनी त्याच्यासोबत व कुटुंबियांसोबत वेळ व्यतित केला. विश्रांती न घेता ते संभाषणात मग्न होते. संध्याकाळी ५.३० वाजता ते त्यांच्या नवीन गोल्फ गाडीतून फेरी मारण्यास गेले. त्या गाडीचे सारथ्य भार्गव करीत होता.

पहाटे ५ वाजता उठून ध्यान करणे, वाचून दाखविण्यात येणाऱ्या बातम्या ऐकणे, न्याहारी केल्यानंतर ई मेल्स पाहणे ही गुरुदेवांची नित्य दिनचर्या पूर्वीप्रमाणे सुरू झाली होती. (तेव्हा सुरू असलेल्या) भारतातील निवडणूक प्रक्रियेवरील बातम्या ते उत्कंठतेने पाहत असत. बातम्या पाहत असताना ते पूर्ण नि:शब्द असून जे काही घडत असेल त्याचे बारकाईने निरीक्षण करत असत. विशेषत: एक्झिट पोल व समालोचकांची निरीक्षणे ऐकण्यास ते उत्सुक असत.

**गुरुबंधुंच्या कुटुंबियांची भेट :** बाबूजी महाराजांच्या गुरुबंधुंपैकी एकाचे कुटुंबीय गुरुदेवांना भेटण्यास आले होते. गुरुदेव बरेच थकले होते व ती त्यांच्या विश्रांतीची वेळ होती तरीसुध्दा ते त्यांना भेटले आणि त्यांना सिटिंग दिले.

गुरुदेव महादेव, महाभारत आणि बुध्द यांच्यावरील दूरदर्शनच्या धारावाहिक मालिका पाहतात.

ते अनेकदा म्हणाले की या मालिका पाहून मी बरेच काही शिकतो आहे. त्यांच्यासोबत या मालिका पाहणाऱ्या अभ्यासींपैकी काही जणांना हिंदी येत नसल्यामुळे मालिका सुरू असताना गुरुदेव त्यांना त्यातील संवादांचे भाषांतर करून समजावून सांगतात.








दि. १९ मे रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास गुरुदेव शॉपींग मॉल मध्ये गेले. ते तेथे बराच वेळ होते. दुपारी २ च्या सुमारास ते उपाहारगृहात पोहोचले. जवळपास पंधरा अभ्यासींसमवेत त्यांनी तेथे दुपारचे भोजन केले. ते स्वत: अतिशय कमी जेवले पण प्रत्येकाने पुरेसे खाणे मागवले आहे याची खात्री त्यांनी करून घेतली. ते एक उत्कृष्ट यजमान आहेत. दुर्दैवाने या सफरीने त्यांना खूप थकवा आला व शारीरिक वेदना होऊ लागल्या. पुढील दोन दिवस त्यांना ताप होता. डॉक्टरांच्या उपचारामुळे काही दिवसांनी त्यांना बरे वाटू लागले.

**अध्ययन – एक निरंतर प्रक्रिया:** दि. ३० मे रोजी गुरुदेवांनी काही रशियन अभ्यासींना सिटिंगसाठी बोलावले. सिटिंग संपल्यानंतर गुरुदेव म्हणाले की पुन्हा रशियन भाषा शिकण्यास मी फार उत्सुक आहे. त्यांनी बंधू ॲलेक्स यांना स्वत:साठी धडे ध्वनीमुद्रित करण्याकरीता येण्यास सांगितले. ते त्यांना सवडीने ऐकता येतील. गुरुदेव म्हणाले, "मी स्वत:च माझे पाठ तयार करणार आहे, त्यांचे ध्वनीमुद्रण करुन आणि नंतर ते ऐकून शिकणार आहे."

शनिवार, दि. २४ मे २०१४: पुडुचेरीहून सुमारे साठ अभ्यासी सप्ताहाच्या शेवटी मणपाक्कमला आले होते. गुरुदेव संध्याकाळी ६च्या सुमारास कुटिराबाहेर येऊन बसले व सुमारे ४५ मिनीटे ते त्या अभ्यासींसोबत होते.

रविवार दि. २५ मे हा भगिनी प्रिया व बंधू कृष्णा यांच्या विवाहाचा वर्धापनदिन होता. गुरुदेवांनी सकाळी उठल्याबरोबर प्रसाद अर्पण केला व तो सर्वांना दिला. सकाळी ७ वाजता हजर असलेल्या सर्वांना त्यांनी सिटिंग दिले.

गुरुदेवांच्या प्रकृतीतील चढउतार चिंताजनक वाटत असल्यामुळे ते सोमवार दि. २६ मे रोजी एमआयओटी हॉस्पिटलमधे तपासणीसाठी गेले. तपासण्यांचे निकाल सामान्य होते. गुरुदेवांनी नरेंद्र मोदींचा भारताचे पंतप्रधान म्हणून झालेला शपथविधी समारंभ पाहिला.

**लालाजी मेमोरियल ओमेगा इंटरनॅशनल स्कूल :** १० वी व १२ वी या दोन्ही सीबीएसई वर्गांचे निकाल घोषित करण्यात आले. ओमेगा स्कूलचा निकाल १००% लागला. इयत्ता १० वीतील १४२ विद्यार्थी सीबीएसई परिक्षेला बसले होते. ते सर्वजण उत्तीर्ण झाले, त्यातील नऊ जणांना १० हा सीजीपीए (संकलित सरासरी दर्जा गुणविषेश/ क्युम्युलेटीव ग्रेड पॉईंट ॲवरेज) मिळाला. गुरुदेवांना अतिशय आनंद झाला व ते ही बातमी सर्वांना सांगत होते.





"आठवण प्रेयसीला प्रियकराच्या निकट आणते. या निकटतेला कोणतीच मर्यादा नसते. जितके प्रेम किंवा आसक्ति अधिक, तितके आपण 'त्यांच्या' अधिक जवळ जातो. हा नातेसंबंध आपल्याला वारसाहक्काने मिळालेला आहेच. आता ते नाते दृढ करून, त्यांच्या अधिकाधिक जवळ जाण्यासाठी प्रयत्न करणे ही जबाबदारी केवळ आपलीच आहे."

बाबूजी महाराज

कंप्लीट वर्क्स ऑफ रामचन्द्र, खंड १, प्रकरण– 'सूत्र २'



## केरळ येथील प्रशिक्षकांसाठी चर्चासत्र

दि. ३०, ३१ मे आणि १ जून, २०१४

मणपाक्कम येथे सुमारे पासष्ट प्रशिक्षक या चर्चासत्रासाठी जमले होते. पहिल्या दिवशी बंधू कमलेश यांनी स्वागतपर भाषण दिले. प्रत्येक दिवशी अनेक सत्रे आयोजित करण्यात आली होती. एकमेकांना वैयक्तिक सिटिंग देणे याचाही यात समावेश होता. या कार्यक्रमात पू. गुरुदेवांच्या वचनांवर मनन करणे व त्यानंतर चर्चा तसेच एकमेकांशी विचारांची देवाणघेवाण, बंधू राजेश राठोड यांच्या समवेत प्रश्नोत्तराचा कार्यक्रम तसेच 'सेवा' या विषयावर एक सत्र अशा उपक्रमांचा समावेश होता. या सत्रामध्ये प्रामुख्याने सेवा करताना आत्मपरीक्षण, सुसंवादाची तत्वे लक्षात ठेवणे, ऐकण्याची कला अवगत करणे आणि सहनशीलता बाळगणे इ. गोष्टींवर भर देण्यात आला.

एका सत्रामध्ये 'गच्चीवरील बागकाम' हाही उपक्रम ठेवण्यात आला होता. सर्व प्रशिक्षकांनी मिळून वाचनालयाच्या गच्चीवर भाजीपाल्याचा वाफा तयार केला. दि. ३१ मे रोजी पू. गुरुदेवांनी सर्व प्रशिक्षकांची भेट घेतली व त्यांना सिटिंग दिले.

बंधू कमलेश यांच्या 'छोट्या परंतु समयोचित गोष्टींमधून केंद्राला कार्यक्षम कसे करावे' या विषयावरील ध्वनिचित्रफितीने व पू. गुरुदेवांच्या 'अभिजातता' या विषयावरील ध्वनिचित्रफितीने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## ओमेगा शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा तिसरा मेळावा

दि. ९ ते १४ जून, २०१४

मेळाव्याची सुरुवात दि. ९ जून रोजी बंधू कमलेश यांनी संचालित केलेल्या सत्संगाने झाली. त्यानंतर सर्वजण सभागृहात जमले. त्यासर्वांसमोर बंधू कमलेश यांनी लहानसे परंतु परिणामकारक असे भाषण केले. त्यानंतरचे सर्व दिवस हे भाषणांनी, विविध अभ्यासींच्या भेटींनी, स्वयंसेवी कार्याने, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या तयारीने आणि ध्यान व अभ्यासाने ओतप्रोत भरलेले होते. सर्व सत्रे व कार्यशाळा मनोरंजक तसेच समृद्ध करणाऱ्या होत्या. त्यांमध्ये जीवनाच्या विविध पैलूंना आणि मूल्यांना स्पर्श करणाऱ्या विषयांचा समावेश होता. दि. १२ जून रोजी सर्वांना गुरुदेवांनी कुटीरामध्ये सिटिंग दिले. त्यावेळी दिलेल्या लहानशा भाषणात त्यांनी १४ जून हा ओमेगाच्या 'माजी विद्यार्थ्यांचा दिन' म्हणून घोषित केला.

दि. १४ जून रोजी सर्वांनी लालाजी मेमोरियल ओमेगा शाळेला भेट दिली आणि त्यांच्या शिक्षक, कर्मचारी या सर्वांबरोबर वेळ व्यतीत केला. सध्या शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोलाचा सल्लाही दिला. जेव्हा ते आश्रमात परतले तेव्हा सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. उत्कृष्ट अशा या कार्यक्रमानंतर पुन्हा एकदा गुरुदेवांना भेटण्याची व त्यांच्या समवेत फोटो काढण्याची संधी माजी विद्यार्थ्यांना मिळाली. सर्वच विद्यार्थ्यांसाठी हा समाधानकारक व अविस्मरणीय असा मेळावा होता.

## नूतन प्रशिक्षकांकरीता प्रशिक्षण कार्यशाळा

दि.३१ मे ते १४ जून, २०१४

मणपाक्कम येथे, प्रशिक्षक बनण्याच्या तयारीचा भाग असणाऱ्या दोन आठवड्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये सुमारे सत्तावीस उमेदवार प्रशिक्षक सहभागी झाले होते. तयारीच्या सिटिंग्सबरोबरच सकाळच्या वेळात चर्चासत्रे व संध्याकाळच्या सत्रात बंधू कमलेश आणि पू. गुरुदेवांचे प्रशिक्षकाच्या कार्यावरील व्हिडिओही त्यांना दाखविण्यात आले. यानंतर त्याविषयाचे सखोल आकलन व्हावे याकरीता त्यांच्याशी चर्चाही केली जात असे, सहभागींनी 'सत्योदय' पुस्तकावरसुद्धा आपसांत चर्चा केली व त्यावर सादरीकरण केले. दोन सत्रे खास सेवेसाठी राखून ठेवण्यात आली होती. यावेळी सर्वांनी बागकाम आणि बांधकाम केले. सत्राच्या शेवटी सर्वांना बंधू कमलेश यांच्यासमवेत चांदण्या रात्री भोजनाचा आनंद लुटता आला.



## सहजमार्गाप्रति माझा दृष्टिकोन

पनवेल, मुंबई

बेंगलोर येथील क्रेस्टचे संचालक बंधू मोहनदास हेगडे यांनी दि.२५ मे रोजी मुंबई केंद्राला भेट दिली आणि सुमारे ऐंशी अभ्यासींसाठी एक सत्र संचालित केले. प्रत्येक सहभागी अभ्यासीने 'सहजमार्गाप्रतीचा माझा दृष्टिकोन' या विषयावर आत्मचिंतन केले. सहजमार्गात नवीन प्रवेश केला असतानाचा दृष्टिकोन आणि आत्ताचा दृष्टिकोन याबद्दलचे आपापले विचार व्यक्त केले.

बंधू मोहनदास यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, आपले जे सर्वात पहिले सिटिंग असते, ते सगळ्यात अधिक महत्वाचे आणि प्रभावी असते कारण यादरम्यान पू. गुरूदेव आपल्या हृदयात बीज रोवतात आणि आपल्या आत्म्याला जागृत करतात. गुरुदेवांच्या या कार्याची महती त्यांनी सर्वांच्या लक्षात आणून दिली व स्वत:च्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये सहभागी होण्यासाठी आपण सर्व तयार आहोत का? असा प्रश्न त्यांनी उपस्थितांना केला. त्यांनी यावेळी प्रार्थनची महती आणि सुस्पष्ट उद्देश्य असण्याचे महत्त्व यावर भर दिला.

## विभाग प्रमुखांची परमकुडी केंद्रास भेट

दि. १७ मे रोजी तामिळनाडू (२ड) विभागाचे प्रमुख बंधू पी. रामनाथन यांनी परमकुडी केंद्रास भेट दिली. परमकुडी, मनमदुरै, रामनाथपुरम आणि सियागंगै या केंद्रांमधून सुमारे चौसष्ट अभ्यासी व प्रशिक्षक यावेळी उपस्थित होते. सकाळच्या सत्संगानंतर ओपन हाऊसचे आयोजन करण्यात आले होते. यात वीस निमंत्रित उपस्थित होते. प्रशिक्षक बंधू रामनाथन, राधकृष्णान, कुमार आणि भास्करन यांनी ध्यानाचे महत्व, सहजमार्गाची ठळक वैशिष्ट्ये व परिणामकारकता हे विषय उपस्थितांना स्पष्ट करून सांगितले. दहा निमंत्रितांनी साधना सुरू करण्यात रूची दर्शविली तर आठ जणांनी पहिले सिटिंग घेऊन साधनेस सुरूवात देखील केली.

यानंतर अभ्यासींनी ध्यानाविषयीचे अनुभव आणि त्यामुळे झालेले फायदे यावर भाषणे केली. संध्याकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आय.आय.एस.सी.(भारतीय विज्ञान संस्थान) बेंगलोर येथील अभ्यासींची मणपाक्कमला भेट

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, बेंगलोर येथे आता ३० निवासी अभ्यासी आहेत. बंधू ए. पेरुमल हे येथील सेवानिवृत्त प्राध्यापक असून ते प्रशिक्षकही आहेत. या अभ्यासींसमवेत दि. ७ आणि ८ जून रोजी बंधू पेरुमल हे मणपाक्कम येथे भेट देण्यास गेले होते. सत्संगास उपस्थित राहण्याबरोबरच या युवा अभ्यासींनी आंबे उतरविण्याची सेवाही आनंदाने देऊ केली. त्यांच्या ह्या भेटीचे खास वैशिष्ट्य म्हणजे पहिल्याच दिवशी संध्याकाळी त्यांना पू. गुरूदेवांसमवेत वेळ व्यतीत करता आला, यावेळी गुरूदेवांनी प्रत्येकाची वैयक्तिक विचारपूस करून त्यांना आशीर्वाद दिले.

रविवारी सकाळच्या सत्संगानंतर त्यांना बंधु व्ही. सोमकुमार, ए.पी. दुरै आणि अल्बेर्टो लाफ्रांची या तीन 'अनुभवी' अभ्यासींसमवेत प्रश्नोत्तराचा कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. या तिघांनी या वेळी गुरूदेव, पद्धती आणि संस्था यावर आधारित अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांची उत्तरे त्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर तसेच रोचक अशा प्रसंगावर आधारलेली होती. भेटीस आलेले सर्वजण आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध आणि पुन्हा नव्या जोमाने अभ्यास करण्यासाठीचा लागणारा उत्साह घेऊन परतले.







## अध्यापक (शिक्षक) विकास कार्यक्रम (FDP), खरगपुर

फेब्रुवारी २०१४ मध्ये पाटणा येथे पार पडलेल्या विभागीय बैठकीमध्ये असे जाणवले की, बिहार आणि झारखंड येथे सध्याच्या 'ग्राऊंडींग इन प्रॅक्टिस' (GITP) या कार्यक्रमाला चालना मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंसेवकाची आवश्यकता आहे. या अनुषंगाने बिहार (३४), झारखंड (२२), पश्चिम बंगाल व उत्तर सिक्कीम(२) आणि दक्षिण पश्चिम बंगाल (१८) या केंद्रांमधील प्रतिनिधींसाठी अध्यापक विकास कार्यक्रम (FDP) ची योजना विभागप्रमुख (विभाग १७ आणि २०) बंधू मनोज तिवारी यांनी आखली.

भगिनी नंदिता माथुर, छवी सिसोदिया तसेच बंधू संतोष श्रीनिवासन आणि अल्बर्टो लाफ्रांची यांची मदत घेत, नवीन स्वयंसेवी प्रशिक्षक एकत्र आले आणि प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यासाठीच नव्हे तर स्वत:साठीसुदधा त्यांनी अभ्यास आणि कसून तयारी केली.

प्राप्त झालेल्या प्रतिक्रियांवरुन असे लक्षात आले की हा कार्यक्रम अतिशय प्रभावी असून, यादरम्यान सर्वांनाच अध्ययनाची संधी मिळाली. या कार्यक्रमामध्ये सर्व सहभागींना आत्मसाक्षात्कारचे, हर्षोल्हासाचे, सखोल चिंतन आणि परीश्रम करण्यास शिकविणारे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बंधुत्वाच्या भावनेने भारलेल्या, उत्तम वातावरणाची अनुभूती देणारे क्षण अनुभवता आले. सुमारे पन्नास प्रशिक्षार्थी आणि पंचवीस मदतनीस आता GITP कार्यक्रम आयोजित करण्यासाठी तयार झाले आहेत.



## प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, जबलपुर

दि. ५ ते ८ जून दरम्यान जबलपुर येथे विभागीय आश्रमामध्ये (विभाग–८बी) मध्यप्रदेश (पूर्व आणि पश्चिम) तसेच विदिशा येथील प्रशिक्षकांसाठी चार दिवसांचा 'प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. बंधू संतोष श्रीनिवासन यांनी ही सत्रे संचालित केली. गुरुदेवांनी निर्धारीत केल्याप्रमाणे 'तुमच्या हृदयाचा विकास करण्यासाठी हृदयावर काम करा' हा या कार्यक्रमाचा प्रमुख विषय होता. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे काही ठराविक वेळापत्रक नव्हते. हृदयाचा मागोवा घेत, आंतरीक शांततेचा अनुभव घेत हा कार्यक्रम संपन्न झाला. सर्व सहभागींनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि उत्कट आध्यात्मिक वातावरणाचा आनंद घेतला.

## पुनर्जागृति– उत्तर तामिळनाडू

२ ए विभागातील सेलम, कृष्णागिरी व वेल्लोर (वडाविरींचीपुरम) येथे दि. २५ मे रोजी तसेच हारुर येथे दि. १ जून रोजी 'चारित्र्य निर्माणाचे साधन–दहा सुक्ते' हा विषयावर आधारीत पुनरुज्जिवीत करणारे आध्यात्मिक संमेलन झाले. समन्वयक भगिनी ईझीलारसी, बंधू रघुपती, सुदर्शन आणि मुरुगरासन यांना अनुक्रमे वरील चार केंद्रामध्ये, अभ्यासींना माहिती देण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. सुक्त १ आणि ३ पासून या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

ही सत्रे परस्परसंवादी असून गुरुदेव आणि बाबूजींच्या अवतरणांनी आणि त्यांच्या नात्याविषयीच्या उतार्‍यांनी परिपूर्ण होती. या सत्रांमध्ये वास्तववादी दृष्टिकोन राखण्याच्या हेतूने जीवनामध्ये आलेल्या वैयक्तिक अनुभवांची परस्परांमध्ये देवाणघेवाण करण्यात आली. या मेळाव्यातून प्राप्त झालेला आनंद इतरांमध्ये वाटण्यासाठी सर्वजण स्वगृही परतले.


हारुर


सेलम


कृष्णागिरी

## ध्यानगृहाचे उदघाटन – नवसारी, गुजरात




गुजरात मधील सर्वात जुन्या अशा नवसारी केंद्राच्या शहराबाहेरील परिसरात मिशनची बरीच मोठी जमीन आहे. या जमिनीवर ध्यानगृहाची सुविधा उभारण्याची अभिलाषा या केन्द्रामधील अभ्यासी बाळगून होते. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करून त्यांनी एक तात्पुरत्या स्वरुपाचा ध्यानकक्ष बांधला. दि. ११ मे २०१४ रोजी विभागप्रमुख (६बी) बंधू सुरेंद्र अग्रवाल यांनी गुरुदेवांच्या संमतीने या आश्रमाचे उदघाटन केले आणि नवसारी व जवळपासच्या चिखली, बिल्लीमोरा आणि अमलसाड केंद्रामधील सुमारे शंभरेक अभ्यासींसाठी सत्संग संचालित केला. याप्रसंगी श्रोत्यांना संबोधित करताना 'आश्रमाचे महत्त्व' त्यांनी विशद केले. आपल्याला असलेला वेळ अतिशय कमी असल्याने सतत आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करणे आणि आपल्या प्रकाशाच्या केंद्रबिंदूचा (म्हणजेच आश्रमाचा) प्रभावीपणे वापर करणे या विषयांवर त्यांनी भर दिला.

रविवारचा सत्संग आता नवसारी आश्रमामध्ये स्थानांतरीत करण्यात आला आहे. गुरुदेवांच्या अस्तित्वाची अनुभूति सर्वांनाच जाणवली. नवसारी केंद्राचे प्रमुख बंधू नितीन हरीयानी यांनी आपल्या भाषणात नवसारी केंद्रामधील सर्व स्वयंसेवकाच्या परिश्रमाचे कौतुक केले आणि वलसाड येथील स्वयंसेवकाच्या चमूची देखील या कामामध्ये मदत झाली हे नमूद केले.

## विभागीय बैठक, हरियाणा

दि. २५ मे रोजी विभाग –२१ हरियाणा येथील सोनपेट आश्रमामध्ये एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व केंद्राचे प्रशिक्षक, सूत्रसंचालक, समन्वयक, स्वयंसेवक आणि केंद्रप्रमुख यांना या बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. ही बैठक विभागप्रमुख बंधू डॉ. सत्या एन. मोंडल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीमध्ये केंद्रप्रमुखांनी आपापल्या केंद्रांबद्दल आणि विभाग समन्वयकांनी आपापली कार्यक्षेत्रांबद्दल उदा. प्रशिक्षण आणि विकास, युकनेक्ट, क्रेस्ट, मूल्याधारित



शिक्षण, निबंध लेखन उपक्रम, माहिती आणि तंत्रज्ञान, अभ्यासी नोंदणी, एकोज वार्तापत्र, इतिहास आणि हिशेब (अकाउन्ट्स) या विषयांवर सादरीकरणे प्रस्तुत केली. या सादरीकरणांनंतर नवीन केंद्रे विकसित करण्याविषयीच्या विविध मुद्यांवर चर्चा झाली. उपलब्ध साधनसंपत्तीचा अधिकतम वापर व्हावा व नवीन तसेच दूरच्या केंद्रांमध्ये देखील परिणामकारकरित्या सेवा देता यावी म्हणून केंद्रांचे पाच गट तयार करावेत असे ठरले.

## मिशनच्या उपक्रमांबद्दल प्रशिक्षण, शाहजहानपुर



दि. ९ ते ११ मे दरम्यान १२–बी या विभागामधील शाहजहानपुर येथील योगाश्रमामध्ये मुल्याधारीत शिक्षण पद्धती, खुले सत्र, घरगुती मेळावे आणि निबंध लेखन कार्यक्रम हे उपक्रम कसे आयोजित करावेत या विषयावर अकरा प्रशिक्षिक आणि एकेचाळीस अभ्यासींसाठी तीन दिवसाच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादातील वक्त्यांमध्ये सचिव बंधू उमा शंकर बाजपेयी आणि विभागप्रमुख बंधू प्रभात कुमार यांचा समावेश होता. या परिसंवादामुळे सर्व सहभागीं नव–नविन कल्पना आणि उत्साहाने भारून गेले. मुल्याधारीत शिक्षण पद्धतीवर आधारित कार्यक्रम आपापल्या केंद्रामध्ये आयोजित करण्याचा निश्चय त्यांनी केला. निबंध लेखन स्पर्धेची आखणी करण्याच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये चर्चा देखील झाली.

# युवा सत्रे



## बनशंकरी आश्रम, बेंगलोर

दि. १४ व १५ जून रोजी बेंगलोरच्या पस्तीस युवा अभ्यासींसाठी सप्ताहाच्या शेवटी एक निवासी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शनिवारी नोंदणीनंतर प्रस्तावना आणि परस्पर परिचयाच्या सत्रानंतर, 'तरंग आणि चिंतन', 'पूर्वग्रह आणि परीक्षण करण्याची वृत्ती' यावर सत्रे घेण्यात आली. प्रत्येक सत्रात सहभागींना आत्मपरीक्षण करण्यास आणि स्वत:चे विचार व्यक्त करण्यास भरपूर वेळ देण्यात येत असे. यानंतर त्या विषयावर एक उपक्रमही घेण्यात येत असे. त्या विषयावर आधारित गुरुदेवांच्या भाषणाची एक चित्रफितसुद्धा दाखविण्यात येत असे. दुपारी काही वेळ स्वयंसेवी कामात व्यतित केला जात असे. साधेपणाने रहा आणि आपल्या इच्छांसाठी नव्हे तर गरजांसाठी जगा या अर्थाचे 'निसर्गाशी एकरुप व्हा' हेही एक सत्र होते.

रविवारचे प्रथम सत्र म्हणजे वरिष्ठ अभ्यासींच्या गटाशी चर्चा होती. यामध्ये सहजमार्गाचा संदेश कसा पसरवावा, आयुष्यात समतोल कसा साधावा, स्वयंसेवी कामांकरीता प्रोत्साहित कसे करावे इ. अनेक विषयांचा उहापोह झाला. दुपारच्या जेवणानंतर एका अभ्यासीने 'स्वागतकक्ष' हा सहजमार्गामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांशी कसा संवाद साधतो याबद्दल थोडक्यात सांगितले. ज्यांना यात रस आहे त्यांना या कामाचे प्रशिक्षण देता येईल असे ते पुढे म्हणाले. परस्परसंवादाविषयीच्या अखेरच्या सत्रात संवाद साधण्याच्या क्षमतेचे महत्व खेळाद्वारे दर्शविण्यात आले. यानंतर प्रेरणादायक भाषणे असलेल्या चित्रफिती उदाहरणादाखल दाखविण्यात आल्या. याचा फायदा सहभागींना छोट्या गटांमध्ये विभागल्यावर 'उचला आणि बोला' या सत्रासाठी झाला. समुदायासमोर बोलताना वापरावयाच्या काही क्लुप्त्या लक्षात ठेवून प्रत्येक गटास एका सदस्याची निवड करून दिलेल्या विषयावर बोलावयास सांगण्यात आले. कार्यक्रम संपायच्या वेळी या उपक्रमात सहभागी होता आल्याबद्दल युवकांनी आनंद व्यक्त केला.



## भिलवाडा, राजस्थान

भिलवाडा केंद्रात दि. २७ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या युवकांसाठीच्या एका बैठकीस तेरा अभ्यासी उपस्थित राहिले. सहभागींनी भंडाऱ्यादरम्यान आलेल्या अनुभवांचे वर्णन केले, नंतर अशा प्रकारच्या उत्सवांना उपस्थित राहण्यासाठी अभ्यासींनी काय पूर्वतयारी करावी यावर चर्चा केली. भंडारा समारंभास उपस्थित राहण्यापूर्वी अभ्यासींनी किमान दोन वैयक्तिक सिटिंग्स घेतली पाहिजेत अशी शिफारस त्यांनी केली. भंडाऱ्यादरम्यान दिली गेलेली स्थिती जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत टिकवून कशी ठेवावी ह्या महत्वाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. यापुढे उत्सवाकरीता तिरुप्पूरला अथवा भिलवाड्याला जाताना स्वत:ला अशा प्रकारे तयार करण्याचा त्यांनी निश्चय केला.

## विजयवाडा, आंध्र प्रदेश

दि. ११ मे रोजी आयोजित केलेल्या युवकांच्या कार्यशाळेत युवकांनी आणि इतर अभ्यासींनी मोठया प्रमाणात भाग घेतला. याचे प्रमुख विषय होते 'चारित्र्य निर्माण' आणि 'अभ्यासीच्या जीवनातील पैशाचे महत्व'. सुरुवातीच्या भाषणात केंद्रप्रमुखांनी युवकांना आपली कर्तव्ये पार पाडण्याविषयी जागरूक व उत्तरलक्षी असण्याचे महत्त्व आग्रहपूर्वक सांगितले. यापकारे, पूर्वग्रह न बाळगता, नीतिपूर्ण जीवनाशी तडजोड न केल्याने आध्यात्मिकतेकडे झुकलेले जीवन जगणे शक्य होते असे ते म्हणाले. बंधू राम चंद्र यांनी आपल्या भाषणादरम्यान चारित्र्य–निर्माणाविषयी मानवी जाणिवांचे मनोहारी रूप प्रस्तुत केले.



युवा सत्रे पुढे चालू...

युवा अभ्यासींनी दहा सादरीकरणे प्रस्तुत केली. या नंतर एक गटचर्चा झाली. ही सादरीकरणे संकल्पनात्मक बाबींना वैयक्तिक अनुभवांबरोबर एकत्र करुन उत्तमरित्या बनविण्यात आली होती. अभ्यासी म्हणाले की त्यांना विविध पैलूंविषयी उच्च अशी अंत:दृष्टी मिळविता आली, जिचा त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांमध्ये निश्चितच उपयोग होईल. ‘प्रेम’ या विषयावरील गुरुदेवांच्या संदेशावर आधारित एका चित्रफितीच्या सादरीकरणाने कार्यशाळेची दणक्यात सांगता झाली. संपूर्ण वेळ एका दिव्य तेजाचा प्रभाव जाणवत होता.

## कोथागुडेम, आंध्र प्रदेश



आध्यात्मिक मूल्यांची समज दृढ करण्याच्या तसेच रुजवण्याच्या उद्देशाने आणि मिशनच्या उपक्रमांबद्दल आपलेपणाची भावना वाढीस लावण्याच्या कल्पनेतून युवकांचे एक परस्परसंवादी सत्र कोथागुदेम आश्रमामध्ये दि. २० एप्रिल रोजी घेण्यात आले. अश्वपूरम, भद्रचलम आणि पोलवचा केंद्रातील युवकसुद्धा यात सहभागी झाले होते. या पूर्ण दिवसीय सत्राला चर्चात्मक उपक्रमाने सुरुवात झाली. ‘युवावस्था हा आश्वासन आणि प्रयत्नांचा काळ का आहे?, ‘युवक म्हणून तुमची भविष्याकडे पाहण्याची दृष्टी कशी असावी?’, ‘युवकांच्या गटांची रचना आणि हेतू काय काय असावा?’ ‘सहजमार्गातील युवकांना प्रेरित करण्यासाठी, कृतीशील बनविण्यासाठी आणि एकत्र आणण्यासाठी कोणत्या प्रकारचे उपक्रम घेतले जावेत?’, ‘मिशनच्या उपक्रमांना युवक कशा प्रकारे हातभार लावू शकतात?’ या विषयसूत्रांवर चर्चा झाल्या. आपली बौद्धिक आणि शारीरिक उर्जा कशी वापरावी जेणेकरुन इतर लोकांसाठी एक योग्य उदाहरण प्रस्तुत करता येईल यावर सर्वांनी विचारांचे आदान–प्रदान केले. त्यामुळे सहभागी आनंदित झाले. या सत्रातील कल्पना या प्रात्यक्षिकाद्वारे व्यक्त करण्यात आल्या यामुळे युवा अभ्यासींना सहभागाची उच्चतम पातळी गाठण्यात यश मिळाले.

## वाराणसी, उ. प्र.

वाराणसी केंद्रात दि. ११ मे २०१४ रोजी एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अभ्यासींना मिशनचे साहित्य वाचण्यास प्रेरित करण्यासाठी एक प्रयत्न म्हणून हे केंद्र ठराविक पुस्तकांवर आधारीत प्रश्नमंजूषेचे आयोजन करीत असते. शेवटच्या दोन सत्रांसाठी तसेच दि. ११ रोजी घेण्यात आलेल्या सत्राकरीता ‘माझे गुरुदेव’ हे पुस्तक निवडण्यात आले होते. अभ्यासींना पन्नास प्रश्न देण्यात आले आणि उत्तरासाठी तीस मिनिटांचा कालावधी देण्यात आला. अर्ध्या तासानंतर योग्य उत्तराचा पुस्तकातील संदर्भासहित स्पष्टीकरण देण्यात आले. अभ्यासींना मिशनच्या पुस्तकांचे सखोल वाचन करण्याची आवश्यकता जाणवली. दुपारच्या जेवणानंतर ‘माझे गुरुदेव’ या पुस्तकातील विषयांवर एक चर्चा झाली. या अभ्यासाचा परिणाम असा झाला की अभ्यासी केंद्रामध्ये थांबले आणि त्यांनी पूर्ण दिवसभराच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. त्यामुळे संध्याकाळच्या सत्संगाची उपस्थितीही वाढली.

## हृदयापासून हृदयाकडे, इंदोर, मध्य प्रदेश

दि. १५ जून २०१४ रोजी इंदोर आश्रमात ‘हृदयापासून हृदयाकडे’ असा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यात्मात रस दाखविणाऱ्या आपल्या सामाजिक आणि कार्यालयीन वर्तुळामधील लोकांची यादी देण्याची अभ्यासींना विनंती करण्यात आली होती. या घोषणेबरोबर जवळजवळ एका महिन्यापूर्वीच या कार्यक्रमाची तयारी चालू झाली होती. सुमारे ३०० लोकांची यादी करण्यात आली आणि त्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. जास्तीत जास्त लोकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा याकरीता स्वयंसेवकांनी खूप पाठपुरावा केला होता. दि. १५ जून रोजी सुमारे १८० जण या कार्यक्रमास उपस्थित होते. मुख्य भाषणाचा विषय ‘अध्यात्मिकता–जीवनाची प्राथमिक गरज’हा होता. हा विषय उदाहरणांद्वारे विस्तृतपणे समजावून सांगण्यात आला. यानंतर सहजमार्ग आणि त्याची तत्वप्रणाली यावर एक सादरीकरण झाले. प्रश्नोत्तराच्या सत्रानंतर सुमारे चाळीस लोकांनी साधनापद्धतीत सहभागी होण्यात रस दाखविला. साधकांच्या सुरुवातीच्या सिटिंग्जचे समन्वय करण्यासाठी एक स्वयंसेवकांचा गट सभागृहात तयारच होता. दुपारच्या जेवणाच्या वेळी सुमारे दहा अभ्यासींच्या एका गटाने उपस्थितांशी जवळून संवाद साधला आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.

या प्रसंगाने स्वयंसेवकांना गुरुदेवांची सेवा करण्याची अपूर्व अशी संधी दिली. तीस अभ्यासी बंधू आणि भगिनींच्या गटाने हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व व्यवस्था केली.







## उन्हाळी शिबिरे

एप्रिल व मे महिन्यात संपूर्ण भारतभर विविध केन्द्रांत उन्हाळी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक केन्द्रातील समर्पित स्वयंसेवकांनी ही शिबिरे यशस्वी व्हावीत यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. मुलांच्या मनावर नैतिक मूल्ये बिंबविणे व ती आचरणात आणण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे हा या शिबिरांचा हेतू होता. छायाचित्रण, संगीत, चित्रकला, कथाकथन, कागदी पिशव्या व दागिने बनविणे, ॲनिमेशन, कापड रंगविणे (बांधणी/ बाटीक) इ. गोष्टी शिकविणाऱ्या कार्यशाळा तसेच खजिन्याचा शोध, प्रश्नमंजुषा, चित्रपट, विज्ञानजत्रा, आनंदमेळे, इ. करमणूकप्रधान कार्यक्रमांची या शिबिरांतून रेलचेल होती. नैतिक मूल्यांवर आधारित नाटिका व मूक अभिनय शब्दांकित करणारी कोडी यासारखे उपक्रम व खेळ यांच्या सहाय्याने मुलांनी नितीमूल्यांचे धडे हसत–खेळत गिरविले. मोठ्या मुलांसाठी चर्चासत्रे, पॉवर पॉइन्ट सादरीकरणे व शैक्षणिक अनुबोधपट इ. उपक्रम आयोजित करण्यात आले होते. काही केन्द्रांमध्ये यामुळे युवकांना आध्यात्मिकतेचा परिचय होण्याचा मार्ग सुकर झाला.

बाबूजी मेमोरियल आश्रम, पनवेल, **मुंबई** येथील तीन दिवसांच्या शिबिरात ११० मुले सहभागी झाली होती. शेवटच्या दिवशी त्यांना हातरुमालावर एकमेकांचा एखादा सकारात्मक गुण लिहावयास व तो हातरुमाल त्या कार्यक्रमाची आठवण म्हणून घेऊन जाण्यास सांगण्यात आले. कर्नाटकातील **रायचूर** आश्रम येथील दोन दिवसांच्या शिबिरात सुमारे तीस मुलांनी भाग घेतला होता. कार्यक्रमामधून त्यांना खूप काही शिकावयास मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्यांना कार्यक्रम इतका आवडला की तो आणखी काही दिवस चालू ठेवण्यासाठी त्यांनी संजोयकांना विनंती केली.

**सितापूर,** उत्तर प्रदेश येथे विविध शाळांमधून आलेल्या साठ मुलांनी नऊ दिवसांच्या उन्हाळी शिबिरात हजेरी लावली होती. तरुणांना आध्यात्मिकतेची ओळख व्हावी या उद्देशाने **बिकानेर**, राजस्थान येथे एका अभ्यासी बंधूच्या खाजगी शिकवणी वर्गाच्या परिसरामध्ये यू–कनेक्टच्या चमूने दहा दिवसांच्या शिबिराचे आयोजन केले होते. आध्यात्मिकतेविषयी सर्वसाधारण जागृती निर्माण करणे व आत्मविकास या विषयांवरील भाषणांबरोबर इतरही उपक्रमांचा या शिबिरात समावेश होता.

**बेंगलोर**, कर्नाटक येथील बनशंकरी आश्रमात आयोजित करण्यात आलेल्या शिबिरास साठ मुले उपस्थित होती.

प्रेरणादायी विषय व मौजेच्या उपक्रमांच्या बरोबरीने **त्रिची** आश्रमामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात 'आगीपासून सुरक्षितता व सुटकेचे उपाय' या विषयावर एक सत्र झाले. 'जानकी फार्म' येथे मुलांची सहल नेण्यात आली. गूळ तयार करण्याची प्रक्रिया पाहून त्यांचे मनोरंजन झाले.

**मणपाक्कम** येथील तीन दिवसांच्या शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक मुलाला घरी नेऊन प्रेमाने संगोपन करीत वाढविण्यासाठी एकेक रोपटे भेट देण्यात आले. स्वतःच्या वाढीबरोबरच त्या रोपट्याची ही जोपासना करीत आपल्या आयुष्यात एक संतुलन निर्माण करण्याची प्रेरणा देणे, हा त्यामागील हेतू होता. शिबिरार्थींनी, मे महिन्याच्या सुरुवातीला केल्या जाणाऱ्या 'मे पोल' या पारंपारिक युरोपियन लोकनृत्यातही भाग घेतला. बहुतेक मुलांनी शिबिराच्या काळात रोजनिशी लिहिली व तिच्यामध्ये प्रत्येक दिवसाचे अनुभव तसेच 'चिरंतन' अशा ईश्वरीय सानिध्यातील क्षणांवर केलेले चिंतन यांची नोंद केली. गुरुदेवांनी दिलेल्या कृपाप्रसादाविषयी कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून मुलांनी गुरुदेवांना एक










सामूहिक छायाचित्र, स्वत: बनविलेली एक कागदी पिशवी व एक रोपटे त्यांना अर्पण केले.

**गोल गोकर्णनाथ** येथील आश्रमात दहा दिवस चालणाऱ्या शिबिरास एक्कावन्न महत्त्वाकांक्षी मुले उपस्थित होती. शिबिरात अभ्यासी बंधू भगिनींनी युनेस्कोच्या 'लर्निंग टू बी' या पुस्तकातील धडे शिकविले. आरोग्य, सुरक्षा, बँकिंग, वनविभाग, पोलिस, रेल्वे इ. विविध विभागातील व क्षेत्रातील अभ्यातज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आपापल्या क्षेत्रांतील नैपुण्य असलेल्या विषयांवर भाषणे दिली.

**विशाखापट्टणम्**, आन्ध्र प्रदेश येथील त्रिदिवसीय शिबिरात वेगवेगळ्या वयोगटांतील एकशे दहा मुलांनी भाग घेतला. मूल्याधिष्ठित उपक्रमांना पूरक म्हणून मातीच्या वस्तू बनविणे व वर्तमानपत्रांच्या कागदापासून पतंग बनविणे इ. उपक्रमही राबविण्यात आले. वैद्यकीय प्रथमोपचार व सुरक्षा यासंबंधीचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले.

**इन्दूर,** मध्यप्रदेश येथील शिबिरात चाळीस मुले उपस्थित होती. शिबिरार्थी रोज एक सामूहिक गीत गात असत. त्यामुळे बंधूभाव व ऐक्याची भावना निर्माण झाल्याचे जाणवत होते. शेवटच्या दिवशी सहल आयोजित करण्यात आली होती. शहरापासून दूर, वनश्रीने नटलेल्या व अलिकडेच खरेदी करण्यात आलेल्या नूतन आश्रमाच्या जागेवर नेण्यात आलेल्या या सहलीचा आनंद मुलांनी मनमुराद उपभोगला.

दरवर्षी उन्हाळी शिबिरांना उपस्थित राहण्यातील आनंद मुले उत्साहाने व्यक्त करीत होती आणि बहुतेक सर्व केन्द्रांतील मुलांनी शिबिराचा कालावधी वाढविण्यासाठी संयोजकांना विनंती केली. स्वयंसेवकासह ज्यां सर्वांनी शिबिरात भाग घेतला त्या सर्वांना ही शिबिरे म्हणजे चांगल्या शिकवणुकीबरोबरच मौजेचाही अनुभव होता.



## उद्‌घोषणा

खरगपूर, पश्चिम बंगाल येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सीआरईएसटी (क्रेस्ट) संस्थेच्या सुविधेचे रूपांतर येथून पुढे रिट्रीट सेंटर म्हणून करण्यात येत आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या व मालंपुझ्झा, केरळ व पुणे, महाराष्ट्र येथे कार्यरत असलेल्या दोन रिट्रीट सेंटर्समध्ये या नवीन सेंटरची भर पडलेली आहे. खरगपूर येथील हे रिट्रीट सेंटर प्रामुख्याने उत्तर व पूर्व भारतातील अभ्यासींची गरज भागवेल.

सीआरईएसटी (क्रेस्ट) संस्था आपले संशोधन, शिक्षण, साधना व प्रशिक्षणाचे कार्य बेंगलोर येथे चालूच ठेवेल व काही काळासाठीतरी बेंगलोर हेच सीआरईएसटी( क्रेस्ट)चे भारतातील एकमेव केंद्र असेल.

**भिलवाडा, राजस्थान**

भिलवाडा केंद्रामध्ये मुलांसाठी दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दि. ११ मे रोजी एक चित्रपट दाखविण्यात आला व त्यानंतर सहभागी मुलांना विचारांची देवाण–घेवाण अधिक चांगल्या तऱ्हेने करता यावी या उद्देशाने काही खेळही घेण्यात आले. दि. १७ मे रोजीच्या सत्राला पंधरा शिक्षकांसह तेरा ते सतरा वयोगटातील ऐंशी युवक हजर होते.

गुरुदेवांची डीव्हीडी दाखवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर नैतिक मूल्यांविषयी व्हीडियो दाखवून त्या चित्रफितीतून आपल्याला काय संदेश मिळाला ते सांगण्याची सर्व सहभागी मुलांना विनंती करण्यात आली.

जेवणानंतर गुरुदेवांचे भाषण ऐकविण्यात आले. 'सकारात्मक दृष्टीकोनाची आवश्यकता' या विषयावरील भाषणानंतर प्रेम, दया, त्याग व वास्तव जीवनातील खरेखुरे प्रसंग यावर आधारित उत्स्फूर्त नाटक सादर करण्यात आले. चेंडू व नळीच्या सहाय्याने खेळलेल्या व ध्येयाचे महत्व विशद करणाऱ्या खेळातून बंधुभाव, प्रेम, संघभावना आणि ऐक्य यासारखे सद्‌गुण दिसून आले. शेवटच्या सत्रामध्ये 'सद्‌गुरुंचे महत्व' या विषयावर चर्चा झाली. प्रत्येकानेच कार्यक्रमाचा आनंद लुटला.






## मुंबई, महाराष्ट्र

दि. २३ मे रोजी मूल्याधिष्ठित शिक्षणाबाबत जागृती व्हावी या हेतूने जुहू येथील बिलाबॉंग आंतरराष्ट्रीय प्रशालेतील सुमारे पंचवीस शिक्षकांसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रशालेच्या मुख्याध्यापकांनी प्रशालेमध्ये मूल्यशिक्षणाचे वर्ग घेण्यासाठी स्वयंसेवकांना आमंत्रित केले होते. भगिनी राखी अरोरा यांनी करून दिलेल्या मूल्यशिक्षणाच्या परिचयाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर भगिनी ललिता यांचे, समाजात आज घडत असलेल्या वाईट गोष्टींमुळे मुलांवर होणारे परिणाम व मुलांना आंतरिक दृष्ट्या बलवान करण्यासाठी घर तसेच शाळेमध्ये मूल्यशिक्षण देण्याची गरज या विषयांवर भाषण झाले. नंतर वडील व मुलगा यांच्या कथेवर आधारित एक व्हीडियो दाखविण्यात आला. ती एक हृदयस्पर्शी कथा होती. पालकांनी तसेच शिक्षकांनीसुद्धा मुलांना समजावून घेऊन त्यांना योग्य मार्गावरून वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी आपला वेळ देण्याची गरज आहे असे तो व्हीडियो पाहून शिक्षकांना प्रकर्षाने जाणवले. कार्यक्र मानंतर काही शिक्षकांनी स्वयंसेवकांशी अनौपचारिक गप्पा मारल्या तर काही जणांनी ध्यानपद्धती समजावून घेऊन ध्यान सुरु करण्यामध्ये स्वारस्य दाखविले.

## करकला, कर्नाटक

दि. १ जून २०१४ रोजी करकला, कर्नाटक येथे आयोजित पूर्ण दिवसीय कार्यक्रमास बारा अभ्यासी उपस्थित होते. गुरुदेवांच्या भाषणाच्या व्हीडियोनंतर भगिनी नलिनी यांनी ‘साधनेमधील मनोभावाची/अभिवृत्तीची भूमिका’ या विषयसूत्राची अभ्यासींना ओळख करून दिली. त्यांनी साधनेमध्ये योग्य मनोभाव ठेवण्याची गरज प्रतिपादित केली. तसेच सहजमार्गाच्या दहा सूत्रांप्रमाणे केलेल्या नियमित आचरणामुळे असा मनोभाव विकसित होण्यासाठी सहाय्य कसे होते ते स्पष्ट केले.



अभ्यासींना त्यांचे जीवनाचे ध्येय व ते करीत असलेली दैनंदिन साधना या संबंधित काही प्रश्नांवर आधारित स्वतःचे मूल्यमापन करावयास सांगण्यात आले. साधनेमधील सकारात्मक मनोभावाची आवश्यकता त्यांनी ठासून सांगितली. तसेच आध्यात्मिक प्रगतीस हानिकारक ठरणारे घटकही स्पष्ट करून सांगितले. त्यांच्या सादरीकरणात गुरुदेवांच्या भाषणातील अनेक कात्रणे/अवतरणे अंतर्भूत केलेली होती. भोजनानंतर सामूहिक चर्चा झाली तसेच मनोभावाविषयी काही कथाही कथन करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रामध्ये सहभागी अभ्यासींचे दोन गट पाडण्यात आले व आधीच्या सत्रात सांगण्यात आलेल्या कथांवर आधारित दोन नाटिका सादर करण्यास अभ्यासींना सांगण्यात आले. त्यानंतर संध्याकाळचा सत्संग होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

## शोलावंदन आश्रम, तामिळनाडू



मदुराई, वडीपट्टी, उसिलंपट्टी, चिन्नलापट्टी व बट्टलगुंडू केंद्रांतील दीडशे अभ्यासी दि. २५ मे रोजी एका पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमासाठी शोलावंदन आश्रमात जमले होते. कार्यक्रमाचा मुख्य विषय होता, ‘सहजमार्ग व कौटुंबिक जीवन’.चेन्नई केंद्रातील भगिनी कस्तुरी वेंकटाचलम्, मदुराई केंद्रातून बंधू पलानियप्पन व चिन्नलापट्टी केंद्रातील भगिनी सावित्री यांना अध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात भगिनी कस्तुरी यांच्या भाषणाने झाली. गुरु–शिष्याचे नाते जन्मोजन्मींचे असते असा विचार त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. बंधू पलानियप्पन यांनी सहजमार्गाच्या पाचव्या व सातव्या सूत्रांवर मनोवेधक विवेचन केले व यातना आणि क्लेश हे ईश्वराने दिलेले आशीर्वाद आहेत असा संदेश अभ्यासींपर्यन्त अतिशय सुरेखपणे पोहोचविला. भगिनी सावित्री यांनी आपल्या भाषणात अभ्यासींच्या कौटुंबिक जीवनाच्या महत्वावर भर दिला. भोजनानंतरच्या सत्रात, ‘सहजमार्ग साधना सुरु केल्यानंतर माझ्यात झालेले परिवर्तन’ या विषयावर गटचर्चा झाली. भगिनी कस्तुरी यांनी चर्चेचा आढावा घेत छोट्याशा भाषणाने गटचर्चेच्या सत्राचे समापन केले. त्यानंतर संध्याकाळचा सत्संग होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

# गंगटोक आश्रम, सिक्कीम

## प्रकाशाचे केंद्र





सिक्कीम या डोंगराळ राज्याची राजधानी असणारे गंगटोक पूर्व हिमालयातील भव्य अशा कांचनजंगा पर्वताच्या कुशीत वसलेले आहे. हे शहर तीन बाजूंनी आंतरराष्ट्रीय सींमांनी वेढलेले आहे. पश्चिमेला नेपाळ, उत्तरेला तिबेट व पूर्वेकडे भूतान अशी राष्ट्रे आहेत. खळखळणाऱ्या झऱ्यांसाठी, समुद्रसपाटीपासून उंचावर असणाऱ्या तलावांसाठी, हिमनद्या आणि जंगलांसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. निसर्गाने बहाल केलेल्या विविधतेने हे शहर नटलेले आहे.

नोव्हेंबर २००५ मध्ये गंगटोक केंद्राची स्थापना झाली. त्यावेळी रविवारचा सत्संग एका अभ्यासी बंधूंच्या घरी होत असे. नोव्हेंबर २००९ मध्ये गुरुदेवांनी गंगटोकला भेट दिली व तीन सुखप्रद असे दिवस अतिशय आनंदात येथे व्यतीत केले. याच दरम्यान गंगटोक आश्रमाच्या कल्पनेने येथे मूळ धरले.

२०११ मध्ये ०.३३ एकरांचा जमिनीचा भाग मिशनला देण्याचा निर्णय सिक्कीम शासनाने घेतला. ही जमीन गंगटोक शहराच्या मध्यभागी होती. या ठिकाणी आश्रमाचे बांधकाम करण्यास गुरुदेवांनी मान्यता दिली. दि. १२ सप्टेंबर २०११ रोजी आश्रमामर्यंत पोचण्याचा रस्ता व कुंपणाची भिंत यांचे बांधकाम सुरु झाले. मानवाची इच्छाशक्ती आणि श्रद्धा यांची निसर्ग नेहमीच परीक्षा घेतो असे म्हटले जाते. दि. १८ सप्टेंबर रोजी, बांधकामाला सुरूवात केल्यापासून केवळ सहा दिवसांनी सिक्कीमला बसलेल्या तीव्र अशा भूकंपाच्या धक्क्याने हे प्रत्ययास आले. आश्रमाला भूकंप निरोधक बनविण्यासाठी बांधकामाच्या आराखड्यात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार मार्च २०१२ मध्ये बांधकाम पुन: सुरू करण्यात आले. भूभागाचा तीव्र चढ, मुसळधार पाऊस असे अडथळे गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने पार करता आले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार, इमारतीचा बाह्यभाग आजूबाजूच्या वातावरणाशी मिळता-जुळता असावा अशी रचना करण्यात आली. एका लहानशा भूभागावर जरी आश्रम उभारण्यात आला असला तरी तो सर्व सोयी-सुविधांनी युक्त आहे. यामध्ये सुमारे दोनशे अभ्यासींची क्षमता असणारा ध्यानकक्ष, गुरुदेवांचे कार्यालय, भोजनकक्ष, स्वयंपाकघर व त्यालगत कोठीची खोली, आश्रमाच्या व्यवस्थापकाचे निवासस्थान, लहान मुलांसाठी केंद्र, प्रसाधनगृह व सुमारे वीस अभ्यासींसाठी निवास व्यवस्था यांचा समावेश आहे. आश्रमाच्या दुतर्फा गोड्या पाण्याचे झरे असून वायव्येला निसर्गरम्य असे नदीचे खोरे दृष्टीस पडते.

दि. २२ जुलै २०१३ रोजी, गुरु-पौर्णिमेच्या दिवशी गुरुदेवांनी चेन्नई येथून या आश्रमाचे उद्घाटन केले. आश्रमाची डि.व्ही.डी. घेऊन आलेले गंगटोक येथील अभ्यासी त्यावेळी उपस्थित होते. उद्घाटनानंतर गुरुदेव उद्गारले, “ मला या ठिकाणी जावेसे वाटते, कमलेश, बाबूजींची अनुमती असेल तर....”







To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2014 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.